# वसई-विरार शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग

दि.१६/०५/२०२३

## प्रेसनोट

केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने (MoHUA) "मेरी लाईफ मेरा स्वच्छ शहर" हे अभियान दिनांक १५/०५/२०२३ पासून दिनांक ०५/०६/२०२३ पर्यंत राबविण्यास कळविले आहे. या अभियानांतर्गत शहरातील नागरिकांनी वापरलेली जुनी पुस्तके, प्लास्टिक, कपडे, पादत्राणे आणि इतर निरुपयोगी वस्तू गोळा करून त्यांचा पुनर्वापर करण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने स्थापित केलेल्या "रिड्यूस, रियुज आणि रिसायकल" सेंटर्स म्हणजेच RRR केंद्रामध्ये जमा करावयाच्या आहेत. RRR (Reduce, Reuse & Recycle) केंद्रामध्ये संकलीत केलेल्या वस्तूंचे नूतनीकरण, पुर्नवापर किंवा नवीन उत्पादने जसे कापडी पिशव्या, पायपुसणी किंवा टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू इत्यादी सारख्या वस्तू तयार करणे हा या उपक्रमाचा मूळ उद्देश आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेने प्रभाग समिती ए ते आय मध्ये एकूण १० RRR (Reduce, Reuse & Recycle) सेंटर्स उभारण्याचे ठरविले आहे. नागरिकांच्या सोयीनुसार, RRR (Reduce, Reuse & Recycle) केंद्र हे हाऊसिंग, शॉपिंग कॉम्प्लेक्स, मोकळे मैदान किंवा बाजारपेठांच्या ठिकाणी उभारण्यात येणार असून दिनांक २० मे २०२३ पासून दिनांक ५ जून २०२३ पर्यंत रोज सकाळी ७:०० ते दुपारी १:०० पर्यंत चालू ठेवण्यात येणार आहे.

वस्तू गोळा करण्यासाठी, नागरिकांना माहिती देण्यासाठी तसेच घरोघरी संपर्क करण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत तसेच, महिला बचत गट व इतर स्वयंसेवी संस्थानच्या मदतीने विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. केंद्र चालवण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी शहरातील नागरिकांनी व संस्थांनी सहभाग घ्यावा. तसेच, केंद्रांना सहकार्य करण्यासाठी पुर्नवापर आणि नूतनीकरणाच्या क्षेत्रात सक्रिय असलेल्या नागरी समाज संस्थांनी (Civil Society Organizations) सहभाग घ्यावयाचा आहे. जेणेकरून वसई विरार शहर महानगरपालिकेचे केंद्र सर्वोत्तम RRR (Reduce, Reuse & Recycle) केंद्र म्हणून शासनास पाठविण्यात येईल. पुर्नविनीकरण साहित्य वापरणाऱ्या स्टार्टअप आणि FMCG (Fast-moving consumer goods) कंपन्यांसोबत भागीदारी प्रस्थापित करण्यात येणार आहे. नागरिकांकडून वस्तू गोळा करण्यासाठी आणि RRR (Reduce, Reuse & Recycle) केंद्रापर्यंत पोहचवण्यासाठी वितरण सेवा देणाऱ्या संस्थांशी भागीदारी करण्यात येणार आहे.

दि. २० मे २०२३ रोजी RRR (Reduce, Reuse & Recycle) केंद्राचे उद्‌घाटन ब्रँड ॲम्बेसेडर मार्फत करण्यात येणार आहे. उद्‌घाटन कार्यक्रमात नागरिक, सफाई मित्र, महिला बचत गट सदस्य, स्थानिक मान्यवर व्यक्ती यांनी सहभाग घ्यावयाचा आहे. सदर अभियानाची ठिकाण माहिती देण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिका, IEC (माहिती शिक्षण आणि संवाद) मार्फत तसेच वृत्तपत्र,बॅनर्स,पॅम्फ्लेट्स,सोशल मीडिया द्वारे RRR केंद्राची जनजागृती करणार आहे. नागरिकांनी व इतर संस्थांनी सोशल मिडियावर पोस्ट करताना #RRR4LiFE, #ChooseLiFE, #India Vs Garbage हे हॅशटॅग वापरावे.

RRR (Reduce, Reuse & Recycle) केंद्र साधारणतः १० स्वयंसेवकाद्वारे (गृहनिर्माण संस्था,बचत गट सदस्य इत्यादी)चालविण्यास कळविले आहे. RRR केंद्रावर मिळालेल्या वस्तूंबाबत रोज "मेरी लाईफ मेरा स्वच्छ शहर" आणि स्वच्छत्तम पोर्टल वर माहिती भरण्यात येणार आहे. दि. १ जून ते ४ जून या कालावधीत RRR (Reduce, Reuse & Recycle) केंद्राचे मूल्यमापन होणार आहे. सर्वोत्तम RRR (Reduce, Reuse & Recycle) केंद्रास दि.०५/०६/२०२३ रोजी महापालिकेच्या हस्ते पुरस्कार देण्यात येणार आहे. पुरस्कार सोहळा पार पाडल्यानंतर 3 सर्वोत्तम केंद्राचा अहवाल केंद्रशासनास सादर करण्यात येणार आहे.

दि. ०५/०६/२०२३ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शहरात मोठ्या संख्येने स्वच्छता मोहीम राबविली जाणार आहे. तसेच मा.केंद्रीय मंत्री, गृहनिर्माण व नागरी विकास मंत्रालय, नवी दिल्ली हे MERI LIFE ची शपथ घेताना थेट प्रसारण करण्यात येणार असून तो शहरात थेट दाखविण्यात येणार आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका